महाराष्ट्र टाइम्स

# ‘सायन्स आर्ट कॉम्पिटिशन’ला उत्स्फूर्त प्रतिसाद

Maharashtra Times| Oct 15, 2018, 04.00 AM IST

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'मी शास्त्रज्ञ झालो तर... २०५० मधील भारतातील शेती...निसर्गातील विज्ञान...माझ्या स्वप्नातील शोध' अशा विविध विषयांवर शालेय विद्यार्थ्यांनी शनिवारी त्यांचे विचार मांडले. निमित्त होते, आयसर आणि सीएसआयआर एनसीएलमधील शास्त्रज्ञांच्या एक्सायटिंग सायन्स ग्रुपतर्फे आयोजित 'सायन्स आर्ट कॉम्पिटिशन'चे. पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांना कला आणि विज्ञान यांच्यातील परस्पर संबंधांची जाणीव व्हावी. त्यांच्यातील सर्जनशीलता, उपक्रमशीलता आणि संशोधनास चालना मिळावी यासाठी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या वर्षी पाचवी ते सातवीच्या गटासाठी 'मी शास्त्रज्ञ झालो तर', 'वातावरणीय बदल व त्याचा सजीवांवर होणारा परिणाम,' 'तुमच्या आजूबाजूला निसर्गात असणारे विज्ञान,' हे विषय देण्यात आले होते. आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी 'माझ्या स्वप्नातील शोध' 'समाजासाठी उत्क्रांतीचे महत्त्व' आणि 'सन २०५० मधील भारतीय शेती' हे विषय देण्यात आले होते. आयसरचे प्राध्यापक डॉक्टर अरविंद नातू यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीस देण्यात आले. डॉ. नातू यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

स्पर्धेत पाचवी ते सातवीच्या गटात मॉडर्न हायस्कूल, गणेशखिंडच्या सुरेंद्र काळभोर याने प्रथम, सिटी प्राइड स्कूलच्या भूमी पाटीलने द्वितीय, आर्मी पब्लिक स्कूलच्या मयांक के डी याने तृतीय तर एसीएस गुरुकुलच्या रमा देशमुखने चौथा क्रमांक पटकावला. आठवी ते दहावीच्या गटात दिल्ली पब्लिक स्कूलच्या आर्यमान भट्टाचार्य याने प्रथम, एअरफोर्स स्कूलच्या दिव्यांशी सिंगने द्वितीय, मॉडर्न हायस्कूलच्या आर्या भावसारने तृतीय तर दिल्ली पब्लिक स्कूलच्या मनय शहा याने चौथा क्रमांक पटकावला.

'एक्सायटिंग सायन्स ग्रुपतर्फे आयोजित ही सहावी स्पर्धा होती. कला आणि विज्ञान यांचा परस्पर संबंध असून दोन्ही गोष्टी कल्पनाशक्ती संशोधन आणि सर्जनशीलतेशी संबंधित आहेत. त्याची जाणीव या विद्यार्थ्यांना व्हावी, यासाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या वर्षी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून तीनशेहून अधिक स्पर्धक सहभागी झाले होते,' असे एक्सायटिंग सायन्स ग्रुपच्या गायत्री क्षीरसागर यांनी सांगितले.